# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम

## जाहिर आवाहन

**सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम - ३ ऑक्टोबर २०२३ ते १३ ऑक्टोबर २०२३.**

क्षयरोग निदान पासून वंचित असणा-या रुग्णांना गृहभेटी द्वारे शोधण्यासाठी केंद्र सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम राबविण्यात येणार आहे. यासाठी उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत शहर क्षयरोग कार्यालय द्वारे ३ ऑक्टोबर २०२३ पासून मोहिमेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. सदर मोहिम ३ ऑक्टोबर २०२३ ते १३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रामधील वंचित घटक म्हणजेच झोपडपट्टीचा भाग, दुर्गम भाग, Old age homes, Transgender Area, Construction sites इत्यादी ठिकाणी गृहभेटी देऊन ASHA Workers क्षयरुग्णंचा शोध घेणार आहे. या मोहिमेत एकूण ५३००० लोकसंख्येचे सर्वेक्षण होणार असून १३२५० एकूण घरे आहेत या करिता १३ पथके तयार करण्यात आली आहे तसेच सर्वच आरोग्य कर्मचारी या मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग घेणार आहेत.

क्षयरोगाची लक्षणे - दोन आठवडयापेक्षा जास्त कालावधीचा खोकला असणे, तसेच दोन आठवडयापेक्षा मुदतीचा ताप असणे, मागील तीन महिन्यामध्ये वजनात लक्षणीय घट असणे, मागील सहा महिन्याच्या कालावधीत कधीही थुंकीवाटे रक्त पडत असणे, मागील एक महिन्यापासून छातीत दुखणे, यापूर्वी क्षयरोगाचे उपचार घेतलेले असणे, ही लक्षणे दिसून येत असल्यास जवळचा शासकीय रुग्णालयात थुंकी नमुना चाचणी व एक्स-रे करुन घ्यावे व आरोग्य पथकास सहकार्य करावे.

तरी शहरातील नागरिकांना या मोहिमेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन उल्हासनगर महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख सो यांनी केले आहे.

**सही/-**
**श्री. अजीज शेख**
**आयुक्त/प्रशासक,**
**उल्हासनगर महानगरपालिका**

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

# राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम

## प्रधानमंत्री टी.बी मुक्त भारत अभियान अंतर्गत निक्षय मित्र नोंदणीबाबत

संसर्गजन्य आजारांमुळे होणा-या मृत्युमध्ये क्षयरोगांमुळे समावेश प्रमुख १० आजारांमध्ये आहे. त्यामुळे संपूर्ण जगामध्ये व भारतामध्ये क्षयरोग क्षयरोग आजारामुळे होणा-या मृत्युंचे प्रमाण लक्षणीय आहे.

क्षयरुग्णांना उपचार कालावधीमध्ये पुरेसा पोषक आहार मिळाल्यास रोग बरे होण्याचे प्रमाण वाढते व रोगामुळे होणारी अनुषंगिक गुंतागुंत टाळता येते. उपचाराखाली असलेल्या व सामाजिक साहाय्य मिळावे यासाठी संमती दिलेल्या क्षरुग्णांना उपचार कालावधीमध्ये पोषण आहार व इतर साहाय्य मिळावे यासाठी मा. राष्ट्रपती महोदयांनी दिनांक 09 सप्टेंबर 2022 रोजी प्रधानमंत्री टी.बी मुक्त अभियानाची सुरुवात केली आहे केंद्र शासनाने क्षयरुग्णांना प्रति व्यक्ती, प्रति महिना आवश्यक खालीलप्रमाणे धान्य, कडधान्य, डाळी, तेल इत्यादी पोषण आहार निक्षयमित्राच्या माध्यमातून देण्याचे प्रयोजन आहे.

| Food Group | Quantity |
|---|---|
| Cereals (Wheat/Rice/etc) | 3 Kgs |
| Pulses, Groundnuts etc | 3 Kgs |
| Edible oil | 1 Kg |

| **OPTION 1(Monthly Basis)** | | |
|---|---|---|
| **Food Groups** | **For adults** | **For Children** |
| Cereals & Millets | 3 Kgs | 2 Kgs |
| Pulses | 1.5 Kg | 1 Kg |
| Vegetable Cooking oil | 250 gms | 150 gms |
| Milk Powder | 1 Kg | 750 gms |

| **OPTION (Monthly Basis)** | | |
|---|---|---|
| **Food Groups** | **For adults** | **For Children** |
| Cereals & Millets | 3 Kgs | 2 Kgs |
| Pulses | 1.5 Kg | 1 Kg |
| Vegetable Cooking oil | 250 gms | 150 gms |
| Milk Powder | 1 Kg | 750 gms |
| Eggs | 30 | 30 |

करिता मा. आयुक्त, मा. अति. आयुक्त, मा. उप-आयुक्त(वैद्यकीय आरोग्य विभाग), उल्हासनगर महानगरपालिका, मा. आमदार, उल्हासनगर-३, रोटरी क्लब ऑफ सपना गार्डन, रेड क्रॉस हॉस्पीटल, आय.सी.आय.सी.आय बँक, उल्हासनगर, महानगरपालिकेचे अधिकारी वर्ग तथा कर्मचारी वर्ग, राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था हे निक्षय मित्र म्हणून साहाय्य करत आहेत. तरी उल्हासनगर शहरातील औद्योगिक संस्था, सहकारी संस्था, राजकीय पक्ष यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, आपण निक्षय मित्र म्हणून नोंद करुन क्षयरुग्णांना दत्तक घेऊन वरील प्रमाणे पोषण आहार द्यावा, जेणेकरुन रोग बरे होण्याचे प्रमाण वाढेल. यासाठी https://reports.nikshay.in/FormalO/DonorRegistration जि या शासकीय पोर्टल वर तसेच शहर क्षयरोग अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत पी.पी.एम. को-ऑर्डिनेटर यांच्याशी दूरध्वनी क्र. 7028669923 ई.मेल dtomhumc@rntcp.org येथे संपर्क साधावा.

सही/-

**श्री. अजीज शेख**

**आयुक्त/प्रशासक,**

**उल्हासनगर महानगरपालिका**